# शिक्षक-पालक सभेचा अहवाल
## सत्र २०२२-२०२३

दिनांक : ०७/०२/२०२३

डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथे शिक्षक-पालक समितीच्या वतीने शिक्षक-पालक सभेचे आयोजन दि. ०७/०२/२०२३ ला करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य-डॉ.यशवंत व्ही.पाटील होते. तर सुत्र संचालन डॉ. विमल राठोड, प्रास्ताविक डॉ. चंद्रशेखर एस.पाटील (समन्वयक) यांनी केले. सभेच्या मार्गदर्शक पॅनलमध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य-डॉ. नरेंद्र एस. बागडे, डॉ. विवेक चव्हाण (वाणिज्य विभाग), डॉ. सुदेश भोवते (नॅक समन्वयक) म्हणून लाभले. शिक्षक-पालक सभेमध्ये संबंधीत पालकांनी आपल्या पाल्यांशी संबंधीत ौक्षणिक समस्या मांडल्या काही सूचनाही दिल्या त्या पुढील प्रमाणे :-




१) शिवचरण चौधरी (कु. पुजा चौधरी या विद्यार्थीनीचे पालक, (बी.कॉम.भाग-२)) -

अ) सेक्युरिटी गार्ड मेन गेटवर राहत नाही.

ब) प्रत्येक महिन्याच्या विद्यार्थ्यांची हजेरी पालकांना पाठवावी.

क) कॅन्टींग मध्ये अल्पोहार चे ुल्क कमी असायला पाहिजे.

ड) जागोजागी कचरा-कुंड **(Dustbien)** असायला पाहिजे.

इ) अभ्यासक्रम किती शिकवून झाला याचा मासिक रिपोर्ट पालकांना पाठविला पाहिजे.

२) अबीदा बानो सैय्यद (मो. मोसीन सैय्यद या विद्यार्थ्यांचे पालक, (बी.कॉम.भाग-२)) -

अ) वॉशरूम वेगवेगळे असायला पाहिजे, स्वच्छता असायला पाहिजे.

ब) इंग्रजी बोलणे वि   याचे क्लॉसेस नियमित व्हायला पाहिजे.

३) सिमा एज़ाज बेग (अनस बेग या विद्यार्थीनीचे पालक, (बी.कॉम.भाग-३)) -

अ) विद्यार्थ्यांनी आपला जास्तीत जास्त वेळ अभ्यासावर केंद्रीत करायला पाहिजे.

ब) सर्व विद्यार्थ्यांनी पालकाचे/गुरूवर्यांचा सन्मान करायला पाहिजे.




४) कविता    ारद वंजारी (कु. दिप्ती वंजारी या विद्यार्थीनीचे पालक,(बी.कॉम.भाग-२)) -

अ) सर्व वि   याचे शिक्षण उपलब्ध असायला पाहिजे.

ब) ग्रंथालयामध्ये बुक्स उपलब्ध नाही.

क) अभ्यासक्रमाचे विशे   ात: **(Income Tax, Skill Development)** चे पुस्तक नाहीत, हिन्दी माध्यमाचे पुस्तक नाही.

५) सिमा मुन्नालाल विश्वकर्मा (कु. ज्योती विश्वकर्मा या विद्यार्थीनीचे पालक, (बी.कॉम.भाग-३)) -

अ) वर्गखोल्यात खिडकी, लाईट ची सोय उपलब्ध नाही.

६) सौ. प्रिती राहाटे (श्री.शुभम राहाटे या विद्यार्थ्यांचे पालक, (बी.कॉम.भाग-२)) -

अ) शिक्षक-पालक सभा दर महिन्याला व्हायला पाहिजे.

ब) पालकांच्या नावाने पोस्टकार्ड, ई-मेल, मॅजेस पाठविला पाहिजे.

क)  मुलींसाठी वेगळे वॉशरूम, कॉमन रूम असायला पाहिजे.

ड)  जे विद्यार्थी महविद्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान करतात त्यांच्याकडून अतिरिक्त  ुल्क भरण्यास सक्ती करावी.

७)  सौ. मंगला वासनिक (श्री.कुशल वासनिक या विद्यार्थ्यांचे पालक,(बी.कॉम.भाग-१)) -

अ)  सकाळी ७ ते १२ पर्यंत कॉलेजची वेळ असते. नंतर ३-४ वाजेपर्यंत माझा मुलगा कुढे जातो, यावर सविस्तर सांगावे.

ब)  ग्रंथपाल- सिध्दार्थ वाणी यांनी हा विद्यार्थी ग्रंथालयात असावे असे सांगितले. इतर पालकांनी काहीच सुचना, समस्या नाहीत असे सुचविले.




महाविद्यालयाचे  ैक्षणिक वातावरण अतिशय चांगले आहे. सर्व प्राध्यापक सहकार्य करतात. पालक या नात्याने आम्ही समाधानी असून महाविद्यालयाप्रती प्रशंसा व्यक्त करतो. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य-डॉ. यशवंत पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भा  णातून पालकांना त्यांच्या पाल्याशी संबंधीत असलेल्या सुचनेचे स्वागत केले व समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. महाविद्यालयातील ग्रंथालय सर्वसोई सुविधांनी उपयुक्त आहे. अभ्यासक्रमाच्या क्रमिक पुस्तकांच्या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांनी संदर्भ ग्रंथाचा जास्त वापर करावा, स्वच्छता, कॉमन रूम व शिक्षक-पालक सभेच्या सुचनेकरिता पालकांशी पत्रव्यवहार करून त्यांना माहिती पाठविण्याचे आश्वासन दिले.

मार्गदर्शन पॅनलमधील मार्गदर्शक म्हणून लाभलेले डॉ. नरेंद्र बागडे यांनी पी.डी.एफ. द्वारे एक महिन्याचा कोर्स महाविद्यालयातर्फे आयोजित करण्यात येते. ज्यामुळे नौकरीच्या विविध क्षेत्रात संधी आहेत असे सुचविले. डॉ. सुदेश भोवते यांनी महाविद्यालयात इंग्रजी वि याचे नियमित वर्ग केल्यास वेगळे इंग्रजी बोलण्याचे क्लास करण्याची गरज नाही, असे सुचविले.

डॉ.विवेक चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शन पर बोलतांना असे सुचविले की, महाविद्यालयात तक्रान निवारण समिती आहे, ैक्षणिक तक्रारी असल्यास त्या बॉक्समध्ये विद्यार्थ्यांनी आपली तक्रार नोंदवू ाकतात.




या सभेचे आभार प्रदर्शन डॉ. सुमेध नागदेवे यांनी केले. शिक्षक–पालक सभेत जवळपास एकूण २० पालक उपस्थित होते. तसेच या सभेत महाविद्यालयातील सर्वच वर्गातील व सर्वच वि यातील प्राध्यापकवृंद प्रामुख्याने हजर होते.

(डॉ.चंद्रशेखर एस. पाटील)
समन्वयक
शिक्षक–पालक सभा समिती

-------

प्रति
मा. प्राचार्य,
डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस.
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
कामठी रोड, नागपूर.

वि  ाय : शिक्षक-पालक सभेचा अहवाल सादर करण्याबाबत.

महोदय,

सेवेशी आपणास निवेदन सादर करतो की, शिक्षक-पालक सभेचे आयोजन दि. ०७/०२/२०२३ ला करण्यात आले होते. या सभेमध्ये खालील सूचना व प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, ते पुढीलप्रमाणे.

१) महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व  ैक्षणिक वातावरणाबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले.

२) पालकांनी आपल्या पाल्याच्या हजेरी बद्दल सुचविले आहे.

३) महाविद्यालयात कचरा संबंधी डस्टबीनचा वापर करावयास सांगितले.

४)कॅन्टींग मध्ये अल्पोहार चे  ुल्क कमी असण्याबद्दल पालकांनी सुचविले

५) अभ्यासक्रम शिकविण्याबद्दल मासिक रिपोर्ट पालकांना पाठवावा याबद्दल कळविले.

६) वॉशरूम वेगवेगळे असायला पाहिजे, व स्वच्छता असायला पाहिजे.

७) ग्रंथालयामध्ये बुक्त उपलब्ध असायला पाहिजे.

८) पालकांना त्याच्या नावाने पोस्टकार्ड, ई-मेल, मॅजेस पाठविला पाहिजे.

वरील प्रमाणे सभेत सुचना व प्रस्ताव प्राप्त झाले. या पॅनलमध्ये उपस्थित डॉ. नरेंद्र बागडे, डॉ. विवेक चव्हाण, डॉ. सुदेश भोवते यांनी पालकांना वरील सुचनेचे पालन करण्याचे आश्वासन दिले. करिता आपल्या माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव सादर, तसेच आपल्या सहकार्याच्या प्रतिक्षेत!

धन्यवाद.

दिनांक : १३/०२/२०२३

(डॉ. चंद्रशेखर एस. पाटील)
समन्वयक
शिक्षक-पालक सभा समिती
डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस.